दैनिक
बातम्यांचा राजा
# जनप्रवास
कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे येथून एकाच वेळी प्रसिद्ध
कोल्हापूर | गुरुवार, दि. २७ ऑगस्ट २०२६ | • वर्ष : १ • अंक : १८७ • पाने : १० मूल्य ₹ ५ | RNI : MHMAR/25/A1283

प्रशांत निकम



## नूतन मराठी विद्यालयामध्ये सायबर सुरक्षेबाबत जनजागृती कार्यक्रम

**जनप्रवास :पट्टणकोडोली**

निपाणी येथील छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,नूतन मराठी विद्यालय निपाणी व क्विक हिल फाउंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमानाने सायबर सुरक्षे बाबत विद्यालयात जनजागृतीपर कार्यक्रम झाला.

देवचंद महाविद्यालयाचे वॉरियर्स पल्लवी विजय पाटील व पल्लवी सतीश पाटील आणि त्यांची सहकारी टीम यांनी आजच्या डिजिटल युगात इंटरनेट, मोबाईल आणि ऑनलाइन व्यवहारांचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. या वाढत्या व्यवहारा बरोबरच सायबर फसवणुकीचे प्रकारही वाढत आहेत. नागरिकांनी अनोळखी लिंकवर क्लिक करू नये, ओ. टी. पी. किंवा पिन-पासवर्ड आगर बँक खात्याची माहिती कोणालाही देऊ नये,असे विद्यार्थ्यांना आवाहन केले. सायबर गुन्ह्यांपासून सुरक्षित राहण्यासाठी मजबूत पासवर्ड वापरणे.तसेच द्विस्तरीय सुरक्षा सुरू ठेवणे. याशिवाय सोशल मीडियावर वैयक्तिक माहिती शेअर करताना काळजी घेणेही आवश्यक आहे असे सांगितले.

प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक विनायक बाचणे यांनी शाळा व नागरिकांमध्ये सायबर सुरक्षा जनजागृती करणे काळाची गरज असल्याचे सांगितले. एस बी पवार यांनी स्वागत केले. यू.आर.पवार यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी सर्व शिक्षक वृंद,विद्यार्थी व पालक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.